महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतूदीनुसार अल्प मुदतीचे/तात्पुरते परवाने देताना अनुसरावयाची कार्यपध्दती

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन परिपत्रक क्र.गौखनि-१०/०३२६/प्र.क्र.०८९/ख-२/ई-१५९८००६**

पहिल मजला, हुतात्मा राजगुरू चौक,

मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक :- १९ मे, २०२६

**संदर्भ** : १.महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८

२.महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३

३.महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. गौखनि-१०/०१२०/प्र.क्र.१७/ख-२, दि.०३.०५.२०२१

**प्रस्तावना:-**

खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम,१९५७ च्या कलम १५(१)(३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ तयार करण्यात आले आहेत. सदर नियमातील गौण खनिजासाठी अल्प मुदतीचे परवाने देण्याबाबत, तसेच सदर परवाने निर्गमित करण्यास असलेले सक्षम प्राधिकारी म्हणून जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांच्याकडून महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ५९ अन्वये तात्पुरते/अल्प मुदतीचे परवाने देण्यात येतात. असे तात्पुरते परवाने देण्याची अधिकारीता नियमामध्ये नियम २ (ज) मध्ये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

नियम २ (ज) सक्षम अधिकारी " याचा अर्थ.....

(एक) या नियमांतील प्रकरण चार च्या प्रयोजनासाठी,

(क) शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जलसंपदा विभाग यांच्या मालकीच्या जमिनीवरील खाणीच्या बाबतीत, फक्त विभागाच्या वापरासाठी कमाल २५,००० ब्रासपर्यतच्या परवान्यासंबंधात संबंधित विभागाचा कार्यकारी अभियंता असा आहे:

(ख) तहसीलदाराच्या संबंधित अधिकारितेच्या हद्दीतील कोणत्याही जमिनीतून, ५०० ब्रासपेक्षा अधिक नसतील एवढ्या प्रमाणात गौण खनिजांचे उत्खनन करावयाचे असेल व ती काढून न्यावयाची असतील तेथे तहसीलदार असा आहे:

(ग) उप विभागीय अधिकाऱ्याच्या संबंधित अधिकारितेच्या हद्दीतील कोणत्याही जमिनीतून, २००० ब्रासपेक्षा अधिक नसेल एवढ्या प्रमाणात गौण खनिजांचे उत्खनन करावयाचे असेल व ती काढून न्यावयाची असतील तेथे महसूल विभागाचे उप विभागीय अधिकारी, असा आहे;

(घ) ज्या जिल्ह्यातील कोणत्याही जमिनीतून, २५००० ब्रासपेक्षा अधिक नसेल एवढ्या प्रमाणात आणि शासनाने किंवा जिल्हाधिकारी यांनी या प्रयोजनार्थ अधिसूचित केलेल्या कोणत्याही महत्त्वाच्या सार्वजनिक प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता गौण खनिजांचा पुरवठा करण्याच्या प्रयोजनार्थ १,००,००० ब्रासपेक्षा अधिक नसेल एवढ्या प्रमाणात गौण खनिजांचे उत्खनन करावयाचे असेल व ती काढून न्यावयाची असतील तेथे त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी, असा आहे:

(दोन) गौण खनिजाचा लिलाव करण्याच्या प्रयोजनासाठी सक्षम अधिकारी याचा अर्थ जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी असा आहे :

(तीन) शासनाने राजपत्रातील अधिसूचनेव्दारे नियुक्त केलेला इतर कोणताही अधिकारी, असा आहे.

अल्प मुदतीचे/तात्पुरते परवाने देताना, ज्या क्षेत्रावर म्हणजे ज्या स.नं/ग.नं. यांचा महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ५८ अन्वये जिल्हा खाणकाम योजनेत समावेश आहे अशा स.नं./ग.नं. मधून अल्प मुदतीचे/तात्पुरते परवाने देण्यात येतात.

परंतु, जिल्हा खाणकाम योजनेत समावेश नसलेल्या स.नं./ग.नं यामधून क्षेत्रीय यंत्रणेकडून तात्पुरते परवाने निर्गमित करण्यात येत असल्याच्या बाबी निदर्शनास येत आहेत. यामुळे भविष्यात न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच काही ठिकाणी जिल्हा खाणकाम योजनेमध्ये स.नं/ग.नं. समावेश करण्याचे प्रस्तावित असताना व समावेश करण्याबाबत नियम ५८ अन्वये समितीचा निर्णय अंतिम झाला नसताना अशा स.नं./ग.नं. मध्ये उत्खनन करण्यास अल्प मुदतीचे/तात्पुरते परवाने देण्यात येत असल्याचे आणि एकाच स.नं./ग.नं. यामधून वारंवार अल्प/तात्पुरते परवाने क्षेत्रीय यंत्रणेकडून निर्गमित करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे ज्या स.नं./ग.नं. मध्ये खाणपट्टा मंजूर करण्यात आला आहे. अशा क्षेत्रावर सुध्दा अल्प मुदतीचे/तात्परते परवाने देण्यात येत आहेत. त्यामुळे नियम ५९ अन्वये देण्यात आलेल्या परवान्याच्या अनुषंगाने नियम ६६ मधील अटी व शर्तीचा भंग होत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच एखाद्या प्रकल्पासाठी/कामासाठी जास्त गौण खनिजाची आवश्यकता असताना एकाचवेळी गौण खनिजाचा तात्पुरता परवाना सक्षम प्राधिकारी यांचेकडून न घेता टप्पाटप्याने ५०० ब्रास मर्यादेत तहसिलदार यांचेकडून तात्पुरते परवाने प्राप्त करून घेतले जातात ही एक अनियमितता आहे. अशा बाबी टाळण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ५८ व ५९ अन्वये अल्प मुदतीचे परवाने देताना तहसिलदार यांच्या स्तरावरून देण्यात येणाऱ्या अल्प/तात्पुरते परवाने देताना अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत आता शासन खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

**शासन परिपत्रक :-**

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ५८ व ५९ अन्वये अल्प मुदतीचे परवाने तहसिलदार यांच्या स्तरावरून देताना तहसिलदार यांनी खाली नमूद करण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

(i) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतूदीनुसार गौण खनिज उत्खननासाठी तात्पुरते परवाने मिळवण्याकरीता तहसिलदार यांचेकडे अर्ज प्राप्त झाल्यास सदर स.नं./ग.नं. हा नियम ५८ अन्वये जिल्हा खाणकाम योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे किंवा कसे यांची त्यांनी खात्री करावी व त्यानंतरच पुढील कार्यवाही करावी.

(ii) अल्प मुदतीचे/तात्पुरते परवाने हे जिल्हा खाणकाम योजनेत नियम ५८ अन्वये समितीच्या मान्यतेअंती समावेश केला असेल केवळ अशा क्षेत्रावर देण्यात (स.नं./ग.नं.) यावेत. समावेश करण्यासाठी प्रस्तावित अथवा विचाराधीन असलेल्या क्षेत्रावर (स.नं./ग.नं.) किंवा ज्या क्षेत्रावर खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला आहे अशा क्षेत्रावर अल्प मुदतीचे/तात्पुरते परवाने देण्यात येवू नयेत. तसेच समितीने एखाद्या विभागाची (उदा.वन विभाग) ना-हरकत प्राप्त करून घेण्याच्या अधीन राहून मान्यता दिली असल्यास सदर ना-हरकत प्राप्त झाल्याशिवाय अल्प मुदतीचे तात्पुरते परवाने देण्यात येऊ नयेत.

(iii) तहसिलदार यांना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतूदीनुसार ५०० ब्रास परिमाणापर्यंत गौण खनिजाचे अल्प/तात्पुरते परवाने देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. एखाद्या कामासाठी/प्रकल्पासाठी संपूर्ण वर्षासाठी जेवढे गौण खनिज आवश्यक आहे, त्या गौण खनिजाचे एकत्रित परिमाण विचारात घ्यावे. तसेच एखाद्या व्यक्तीस/संस्थेस वारंवार गौण खनिजाचे अल्प/तात्पुरते परवाने आवश्यक असतील तर त्याकरीता वर्षभरात आवश्यक असलेल्या एकूण गौण खनिजाचे परिमाण विचारात घ्यावे. अशा प्रकारे वर्षभराचे परिमाण निश्चित केल्यानंतर गौण खनिजाचे अल्प/तात्पुरते परवान्याचे परिमाण ५०० ब्रासपेक्षा अधिक होत असल्यास त्यानुषंगाने अल्प/तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव परिमाणानुसार अधिकारीता असलेल्या जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

(iv) अशा प्रकारे तहसिलदार यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी अल्प/तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही करावी. तथापि, एखाद्या व्यक्तीस अथवा संस्थेस परिमाणानुसार अधिकारीता असलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने (जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी) थेट अर्ज करण्याची मुभा असेल.

(v) अल्प मुदतीच्या परवान्यांसाठी जे क्षेत्र (स.नं./ग.नं.) जिल्हा खाणकाम योजनेत समाविष्ट करण्यात आले आहेत, अशा क्षेत्रातून तहसिलदार यांनी एका वर्षामध्ये एकदाच अल्प/तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही करावी. मात्र एखाद्या शेतकरी/गावकरी यांना विहीरबांधकाम किंवा घराच्या बाधंकामासाठी आवश्यक असलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल(गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ मध्ये नमूद करण्यात आलेल्या मर्यादेत मुरूम/माती गौण खनिजासाठी अल्प/तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही तहसिलदार यांना त्यांच्या अधिकारात करता येईल. तसेच पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या वडार व कुंभार समाजाच्या अधिकृत व्यक्तींना प्रचलीत नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या त्यांच्या करिताच्या वार्षिक मर्यादेत गौण खनिज उत्खननासाठी अल्प/तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही तहसिलदार यांनी करावी.

(vi) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ चे नियम ५९ व ६० अन्वये देण्यात आलेल्या अल्प/तात्पुरत्या परवानाव्दारे कोणत्याही वेळी खड्याची पृष्ठभागापासूनची खोली सहा मीटर (६ मीटर) पेक्षा अधिक असणार नाही/होणार नाही यादी दक्षता घ्यावी.

(vii) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ९ अन्वये शासकीय जमिनीवर खनिपट्टे जाहीर लिलावाने/लिलावाव्दारे देण्यात येणारे असल्याने शासकीय जमिनीवर (पारंपारिक कुंभार व वडार समाजाचे व्यक्तीस नियमानुसार वगळून) इतरत्र अल्प/तात्पुरते परवाने दिले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

(viii) तहसीलदार यांनी त्यांच्या संबंधित अधिकारितेच्या हद्दीतील ज्या क्षेत्रातून (ग.नं./स.नं.) ५०० ब्रासपेक्षा अधिक नसतील एवढ्या प्रमाणात गौण खनिज उत्खननाची वार्षिक मुदत संपल्यानंतर ई.टी.एस. मोजणी करून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करावा व जास्तीचे उत्खनन झाले असल्यास जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार स्वामित्वधन भरून घेण्याची कार्यवाही अथवा दंडात्मक कारवाई करावी.

(ix) सक्षम प्राधिकारी यांनी त्यांच्या अधिकारितेच्या हद्दीतील ज्या क्षेत्रातून (ग.नं./स.नं.) उत्खननास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यांनुषंगाने वर्षातून एकदा ई.टी.एस. मोजणी करण्यात यावी व सदर ई.टी.एस. मोजणीच्या अनुषंगाने अतिरिक्त उत्खनन आढळल्यास ७ दिवसाच्या आत खाणपट्टाधारक यांना अतिरिक्त उत्खननाचे स्वामित्वधनाची रक्कम भरण्याची नोटीस देण्यात यावी. याप्रमाणे स्वामित्वधनाची रक्कम ३० दिवसाच्या आत जमा करून घ्यावी. पुढील कार्यवाही दिनांक ०३.०५.२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये करण्यात यावी. ३० दिवसात सदर रक्कम जमा न केल्यास पुढील ७ दिवसात दंडात्मक कारवाई करण्यात येवून दंड वसूल करण्यात यावा.

(x) परवान्यांची मुदत संपल्यानंतर उत्खनन क्षेत्राची/खड्ड्यांचे संदर्भाने आवश्यक सुरक्षात्मक उपययोजना करणे व त्याचे अनुपालन अहवाल सादर करण्याची जबाबदारी संबंधित परवानाधारकावर निश्चित करावी.

(xi) गौण खनिजाचे उत्खनन व वाहतुकीकरीता शासन वेळोवेळी निश्चित करेल त्या संगणक प्रणालीचा वापर करणे अनिवार्य राहील.

(xii) उपरोक्त सूचना जशाच्या तशा (Muntadas Mut Audis) उपविभागीय अधिकारी यांना देखिल लागू राहतील. तसेच वरील प्रमाणेच तहसिलदार व उप विभागीय अधिकारी यांचेकडून परवाने दिले जातील याबाबत जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी खात्री करावी.

(xiii) उक्त प्रमाणे तहसिलदार अथवा उप विभागीय अधिकारी यांच्याकडून अंमलबजावणी करण्यास कसूर करणाऱ्या संबधितांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावीत करावी.

(xiv) विविध शासकीय विभाग/निमशासकीय विभाग/महामंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था(शहरी व ग्रामीण) इत्यादी तसेच सर्व व्यावसायिक व औद्योगिक करणांसाठी लागणारे गौण खनिज

खाजगी क्षेत्रातून उत्खनन होणार असेल तर असे सर्व परवाने जिल्हाधिकारी निर्गमित करतील.

(xv) कुंभार समाजाकरिता/कुंभार समाजाचे पारंपारिक व्यवसायाकरिता स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(xvi) जलसंधारण प्रकल्पाचे किंवा जलसंपदा तलावातून शेतकरी शेती विकसित करणे करिता गाळ नेणार असतील तर स्वामित्वधन आकारू नये/दंड करू नये.

(xvii) शेत पाणंद/वहीवाटदार रस्ते बांधकामाकरीता जलसंधारण/जलसंपदा तलावातील माती, मुरुम या गौण खनिजावर स्वामित्वधन व कोणताही दंड आकारू नये.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०५१९१८३२१७४४१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरिने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9BD008875B6A3A9FDDAD3E55FE0328DF13A27221CB2BBC67ABD0155F914EFC01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2026.05.19 18:33:24 +05'30'

**(सदानंद गो. मोहिते)**
**कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग**

**प्रति,**

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व उपविभागीय अधिकारी
४. सर्व तहसिलदार

**प्रत,**

निवड नस्ती कार्यासन खनिज-२